☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट /      /पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 /      दिनांक : 08/09/2025

# ईद–ए–मिलादुन्नबीची मिरवणुक शांततेत संपन्न..

दिनांक 05.09.2025 ईद–ए–मिलादुन्नबी असल्याने त्या अनुषंगाने मुस्लीम समाजाची मोठी मिरवणूक निघत असते परंतु श्रीगणेशोत्सव असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही व दोन्ही उत्सव शांततेत साजरे व्हावे या करीता दिनांक 26.08.2025 रोजी मा.श्री अबिनाश कुमार,पोलीस अधीक्षक नांदेड यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड येथे मुस्लीम समाजाचे मरकज मिलाद कमिटीचे पदाधिकारी व मुस्लीम धर्मगुरू यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

**मा.श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक,** नांदेड, मुस्लीम समाजाचे मरकज मिलाद कमिटीचे पदाधिकारी व मुस्लीम धर्मगुरू यांचेमध्ये मिरवणूकी बाबत सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती **नांदेड शहरातील ईद–ए–मिलादुन्नबीची मुख्य मिरवणुक दिनांक 05.09.2025 रोजी ऐवजी दिनांक 08.09.2025 रोजी होणार** असल्या बाबत मुस्लीम समाजाचे मरकज मिलाद कमिटीचे पदाधिकारी व मुस्लीम धर्मगुरू यांनी जाहिर केले होते.

त्यानुसार आज दि.08/09/2025 रोजी चे 09.40 वा ईद–ए–मिलादुन्नबी निमीत्त मुस्लिम समाजाची भव्य मिरवणुक निजाम कॉलणी– आय टी आय चौक–वजीराबाद चौक–छत्रपती शिवाजी महाराज पुतळा–महावीर चौक –जुना मोंढा–हबीब टॉकीज–मस्तानशहा वली दर्गा या मार्गे निघुण 14.20 वा शांततेत संपन्न झाली. सदर मिरवणुकीमध्ये अदाजे 25 ते 27 हजार जनसमुदाय व विविध देखावे असलेली वाहणे सहभागी झाली होती. सदर मिरवणुकीतील मुस्लीम समाजाचे मरकज मिलाद कमिटीचे पदाधिकारी व मुस्लीम धर्मगुरू यांचे **मा.श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक,** नांदेड यांनी मिरवणुकीचे सुरूवातीस निजाम कॉलणी येथे पुष्पहार घालुन स्वागत केले.

नुरी चौक येथुन निघालेली मिरवणुक आय टी आय चौक येथे मुख्य मिरवुणीत सामील होत असतांना त्यांचे **मा.श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक,** नांदेड यांनी पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले. विशेष बाब म्हणजे रेणुका माता मंदीराचे पदाधिकारी यांनी ईद–ए–मिलादुन्नबी मधील पदाधीकारी यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत करून समाजात एक चांगला संदेश प्रसारीत केला.

नांदेड शहरात बंदोबस्त कामी नेमण्यात आलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी अतिशय शिस्तबध्दपणे बंदोबस्त करून कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत सर्वतोपरी काळजी घेतली. मिरवणुकीतील सहभागी नागरीकांनी पोलीस प्रशासनांनी दिलेल्या सुचनेचे योग्य पालन केले व मिरवणुक शांततापुर्वक साजरी केली त्याबद्दल **मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधिक्षक, नांदेड यांनी नांदेड मरकज मिलाद कमिटीचे पदाधिकारी, मुस्लीम धर्मगुरू व मिरवणुकीत सहभागी नागरीकांचे अभिनंदन करून आभार मानले आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड